# रोजगार हमी योजना सर्चच्या निर्माण समूहाने टिपलेलं वास्तव

## 'हाताला काम लवकर नाही दाम'

गडचिरोली, दि.७ (शहर प्रतिनिधी)- 'हाताला काम आणि कामाला दाम' मिळण्याची हमी म्हणजे रोजगार हमी योजना. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, अडचणीच्या काळात सुरक्षिततेची हमी म्हणजे रोजगार हमी योजना. पण गडचिरोली व धानोरा तालुक्यातील ११ गावात याच्या अगदी उलट व संतापजनक परिस्थिती लोकांमध्ये निर्माण झाली आहे. डॉ. अभय व राणी बंग यांच्या सर्च या सामाजिक संस्थेअंतर्गत निर्माण समूहाचे तरुण मग्रारोह योजनेच्या जनजागरणासाठी धानोरा व गडचिरोली तालुक्यात काम करीत असताना हे वास्तव त्यांच्या निदर्शनास आले आहे.



धानोरा तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणारे मजूर.

कुठलाही आर्थिक गैरव्यवहार होऊ नये म्हणून एप्रिल २००९ पासून केंद्र सरकारच्या आदेशानुसार मजुरांना बँकांमधूनच मजुरीचे वाटप करण्यात यावे, याची अंमलबजावणी जिल्हाभरात सुरू झाली. केंद्र सरकारचा हा निर्णय योग्य असला तरी या निर्णयामुळे मजुरांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. गडचिरोली व धानोरा तालुक्यातील ११ गावातील मिळालेला नाही. तळपत्या उन्हात अंगाची लाही लाही होत असतानाही पोटाची खळगी भरण्यासाठी काबाडकष्ट करूनही मोबदला ताबडतोब मिळत नाही. ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

रोजगार हमीच्या कायद्यानुसार सेक्शन ३ (३) काम झाल्यानंतर मजुरी ही १५ दिवसाच्या आत मिळावी हे माहीत असतानाही कायदे करणाऱ्यांनीच स्वतःचे डोळे बंद करून घ्यावे, अशी स्थिती निर्माण झाली आहे. गावापासून बँकेचे अंतर, लागणारा प्रवास खर्च, वेळ यामुळे बँकेचा वापर करणे ही लोकांसाठी अत्यंत त्रासदायक गोष्ट झाली आहे. गावामध्ये असलेली पोष्ट कार्यालये सुद्धा ही कामे करण्यासाठी सक्षम नाहीत.

याही पलीकडची स्थिती बघितल्यास बँकांची पोहोच गावापर्यंत नाही, ज्या गावामध्ये बँका आहे तिथे बँकेत खाते खोलण्यासाठी लागणारी प्रक्रिया म्हणजे लोकांसाठी डोकेदुखी आहे. गावातील मजूर व गावासाठी काम करत असलेला ग्रामरोजगार सेवक बँकेत चकरा मारून अगदी त्रस्त झाला आहे. बँकेच्या लांबच लांब रांगेत उभे राहून पूर्ण दिवस एकाच कामात गेला तर संध्याकाळी काय खायचे? असा प्रश्न उभा राहतो. सावंगा बु. मधून १४६ मजूर १४ दिवस कामावर होते. ५१ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक ८५ किमी दूर धानोरा येथे आहे. कोंदावाही मधून ८० (पान ३ वर)

# रोजगार हमी योजना सर्चच्या निर्माण.....

मजुरांनी २३ दिवस काम केले. २५ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक ४० किमीवर चातगाव येथे आहे. झाडापापडा मधून १५० मजुरांनी १५ दिवस काम केले. २५ दिवसानंतरही मजुरी नाही, बँक ८५ किमी अंतरावर धानोरा येथे आहे. विहिरगावमधून १५० मजुरांनी १५ दिवस काम केले. २५ दिवसानंतरही मजुरी नाही. बँक १५ किमीवर येवली येथे आहे. रेखाटोला मधून ७४ मजूर ४० दिवस कामावर होते. ४१ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक १८ किमी अंतरावर चातगावला आहे. राजोलीमधून ३११ मजूर १५ दिवस कामावर होते. ५५ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक ३५ किमी अंतरावर गडचिरोली येथे आहे. कुथेगावमधून ६९ मजूर ४५ दिवस कामावर होते. पण ६५ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक १८ किमी दूर चातगावला आहे. गिलगावातून २५० मजुरांनी १४ दिवस काम केले. ६० दिवस उलटूनही मजुरी नाही. बँक ६ किमी दूर अमिर्झा येथे आहे. देवसरा गावातील ५८ मजूर ८ दिवस कामावर होते. ६० दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक ५ किमी दूर मालेवाड्यामध्ये आहे. इदूपटोला गावातून ४५६ मजूर २० दिवस कामावर होते. ५७ दिवस उलटूनही मजुरी मिळाली नाही. बँक ६ किमी दूर मालेवाडा येथे आहे. निर्माण झालेल्या एकंदरीत स्थितीमुळे या ११ ही गावातील २१११ लोकं आपल्या मिळणाऱ्या मजुरीची वाट पाहत असून पैसे लवकरात लवकर मिळतील, ही आशाच फक्त आता या लोकांकडे उरली आहे. ११ ही गावातील लोकांची क्रोधाग्नी भडकलेली असून शासनविरोधात केव्हा बंड पुकारल्या जाईल हे सांगता येत नाही. करिता या समस्येमध्ये शासनाने जातीने लक्ष घालून लवकरात लवकर उपाययोजना करण्याची गरज आहे. गावातील ही समस्या लवकर सुटावी म्हणून सर्चअंतर्गत संस्थेचे उपसंचालक तुषार खोरगडे व निर्माण समूहाचे तरुण गोपाल महाजन व प्रियदर्शन सहस्रबुद्धे यांनी गडचिरोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अतुल पाटणे यांच्याकडे निवेदन दिले आहे.